# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३५३-२२ दिनांक २५/११/२०२२

## सिगारेट व तंबाखु मिश्रीत हुक्का फ्लेवर्स विक्री करणारे गुन्हेगार जेरबंद. नयानगर पोलीस ठाण्याची कारवाई

दिनांक २४.११.२०२२ रोजी नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीत विनापरवाना सिगारेट व इतर सुंगधी तंबाखुची विक्री खुलेआमपणे पान विक्री शॉप वर चालू असल्याची खात्रीलायक माहिती गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाल्याने सदर माहितीची गंभीर दखल घेवुन वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली नयानगर पोलीस ठाणे हद्दित कारवाई करण्यासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली.

सदर पथकाने राधेशाम अच्छेलाल गुप्ता याचे राधेशाम पान शॉपवर छापा टाकला असता सदर पान शॉपमध्ये ६२,३००/- रुपये किंमतीचे विविध कंपनीचे प्रतिबंधीत तंबाखु मिश्रीत हुक्का फ्लेवर्स मिळुन आले. तसेच दुसऱ्या पथकाने आमीन महंमद हुसेन मर्चेट याचे आलीबाबा पान शॉपवर छापा टाकला असता सदर दुकानात ३,०५,३१३/- रुपये किंमतीचे विविध कंपनीचे प्रतिबंधीत तंबाखु मिश्रीत हुक्का फ्लेवर्स मिळुन आल्याने सदर कार्यवाहीमध्ये दोन स्वंतत्र पंचनामे करुन मिळून आलेला मुददेमाल हा जप्त करण्यात आला आहे. नमूद दोन्ही इसमांविरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे अनुक्रमे गु.र.क्र.८३९/२०२२ व गु.र.क्र.८४१/२०२२ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने याचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन पुरवठा व वितरण यावर निर्बंध अधिनियम २०१९ च्या कलम ७ अन्वये दोन स्वतंत्र गुन्हे नोंद करून एकूण ३,६७,६१३/- रु. किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड, डॉ. श्री. शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नयानगर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. प्रणय काटे, पराग भाट, स.पो.फौ. पाटील पो.हवा. गुरव, बागवान, विकास यादव, पो.ना. वारके, कांबळे, पो.अं. खामगळ यांनी केलेली आहे.

----oooo----